कार्यालय पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वर्धा
मुख्य बि.एस.एन.एल. ऑफीस समोर, सिव्हील लाईन, वर्धा
दुरध्वनी क्र. 07152–243844 ई.मेल acbwardha@gmail.com

# प्रेस नोट

दिनांक 14.01.2026

तक्रारदार यांचे डोंगरगाव शेत शिवारात शेत क्र. 59/1 नुसार 2.49 हे.आर. क्षेत्र असुन तक्रारदार यांच्या सात बाऱ्यावर सन 2024 ते 2025 चे पेरेपत्रक चढविण्यासाठी तक्रारदार आलोसे श्री. ललितकुमार जोगे, पद – तलाठी, ग्रामपंचायत काजळी, ता. कारंजा,जि.वर्धा यांचे कार्यालयात गेले असता आलोसे यांनी त्यांचे पदाचा दुरूपयोग करून 3000/–रू. ची लाच मागणी करून रंगेहात स्विकारतांना मिळुन आले.

| | |
|---|---|
| आलोसे यांचे नाव | श्री. ललितकुमार रामकृष्णाजी जोगे, वय 40 वर्षे, पद – तलाठी, ग्रामपंचायत काजळी, ता. कारंजा,जि.वर्धा, वर्ग – 3, रा. सुखकर्ता नगर, आलोडी, ता.जि.वर्धा |
| गुन्हा घटना ता.वेळ व ठिकाण | दिनांक 14.01.2026 चे 13.24 वा. ते 14.23 वा. दरम्यान मौजा काजळी साजा,ता.कारंजा,जि. वर्धा आलोसे यांचे कक्षात |
| लाचेची रक्कम | 3000/–रू. |

यातील तक्रारदार हे यांची डोंगरगाव शेत शिवारात शेत क्रमांक 59/1 नुसार 2.49 हे.आर. शेज जमिन क्षेत्र आहे. तक्रारदार यांचे शेतीचे सात बाऱ्यावर सन 2024–2025 पेरपत्रक चढविण्यासाठी यातील तक्रारदार व त्यांचे मित्र असे मिळुन दिनांक 07.01.2026 रोजी तलाठी श्री. ललित जोगे यांचे साजा काजळी येथे गेले असता आलोसे श्री. ललित जोगे यांनी सातबाऱ्यावर पेरपत्रक चढविण्यासाठी तक्रारदार यांना 3000/–रू. लाच रकमेची मागणी केली. तक्रारदार यांची नमुद आलोसे यांना लाच रक्कम देण्याची मुळीच ईच्छाचा नसल्याने दिनांक 14.01.2026 रोजी तक्रारदार ला.प्र.वि. वर्धा येथे तक्रार देण्यास आल्याने त्यांचे तक्रारी वरून आलोसे यांचे वर दिनांक 14.01.2026 रोजी लाच मागणी पडताळणी केली असता आलोसे यांनी 3000/–रू. लाच रकमेची मागणी केल्याची संमती दिल्याने आलोसे यांचेवर लाच सापळा कार्यवाही केली असता नमुद आलोसे श्री. ललितकुमार जोगे यांनी त्यांचे पदाचा दुरूपयोग करून तक्रारदार यांचे कडुन 3000/–रू. लाच रक्कम स्विकारतांना पंचा समक्ष रंगेहात मिळुन आल्याने त्यांना लाचेचे रकमेसह पो.नि.कान्होपत्रा बन्सा, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वर्धा व सापळा कार्यवाही पथकाने रंगेहाथ पकडले व अंगझडती घेतली असता लाच रक्कम 3000/–रू. व एक रेडमी कंपनीचा मोबाईल मिळुन आला.

आलोसे श्री. ललितकुमार रामकृष्णाजी जोगे, वय 40 वर्षे, पद – तलाठी, ग्रामपंचायत काजळी, ता.कारंजा,जि.वर्धा, वर्ग – 3, रा. सुखकर्ता नगर, आलोडी, ता.जि.वर्धा यांचेवर पोलीस स्टेशन कारंजा, जि.वर्धा येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कार्यवाही श्री. दिगांबर प्रधान, पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपुर श्रीमती माधुरी बाविस्कर, अप्पर पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपुर यांचे मार्गदर्शानात पर्यवेक्षक अधिकारी राकेश साखरकर, पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि. वर्धा, सापळा अधिकारी श्रीमती कान्होपात्रा बन्सा, पोलीस निरिक्षक, श्री. संदिप मुपडे, ला.प्र.वि. वर्धा व पथकातील पो.हवा. पंकज डाहाके, मंगेश झांमरे, मपो.हवा. राखी फुलमाळी, पो.कॉ. प्रशांत मानमोडे, मनिष मसराम, लक्ष्मण केंद्रे व चालक स.फौ. गणेश मेश्राम सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ला.प्र.वि. वर्धा यांनी केली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वर्धा कडुन आव्हान करण्यात येते की, कोणी लोकसेवक स्वतः अगर इतरांमार्फत शासकिय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास टोल फ्रि क्रमांक 1064, दुरध्वनी क्र. 07152–243844 व व्हॉटस ॲप मोबाईल क्र. 7517611064 व पोलीस उपअधिक्षक, मो.क्र.7350902100 वर संपर्क करावा. तसेच आमचे ई.मेल acbwardha@gmail.com वर तक्रार करावी.

( कान्होपात्रा बन्सा )
पोलीस निरिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वर्धा